महाराष्ट्र शासन
अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन ( महाराष्ट्र राज्य ),सर्व्हे नं ३४१, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१.
दूरध्वनी क्र. ०२२२६५९२३६२ ते ६५
ईमेल : jc-foodhq@gov.in

महाराष्ट्र शासन
FOOD AND DRUG ADMINISTRATION
Your Service is Our Duty
आपली सेवा आमचे कर्तव्य

Government Of Maharashtra
Food Safety Commissioner,
Food and Drugs Administration (Maharashtra State), Survey No. 341, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400051.
Phone 02226592362 to 65.
Email: jc-foodhq@gov.in

---

जा.क्र. असुमाका/सणासुदीची मोहीम/८५४/२०२५/७ दिनांक: १४/०८/२०२५

<u>ज्ञापन</u>

विषय :- <u>अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, नियम व नियमन २०११</u> राज्यभरात " सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा" अभियान , राबविणेबाबत..

प्रशासनांतर्गत सर्व विभागीय सह आयुक्त (अन्न) यांना उपरोक्त विषयाच्या अनुषंगे कळविण्यात येते की, माहे ऑगस्ट २०२५ ते माहे ऑक्टोबर २०२५ या सणासुदीच्या कालावधीत गणपती, ईद, नवरात्र, दसरा, दिवाळी इत्यादी सण मोठ्या प्रमाणावर उत्साहात आणि भक्तिभावाने साजरे केले जातात. या काळात नागरिक मोठ्या प्रमाणावर मिठाई, फराळ, प्रसाद, व खाद्यपदार्थांचे सेवन करतात. परिणामी, अन्नपदार्थांच्या मागणीत मोठी वाढ होते. ही वाढती मागणी पूर्ण करताना काही अन्न व्यावसायिकांकडून अयोग्य, कमी दर्जाचे किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ तयार/विक्री करण्याचा संभव असतो. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असते. अन्नपदार्थात भेसळ करणाऱ्यांवर जरब बसण्याकरिता व भेसळ रोखण्याकरिता तसेच राज्यातील जनतेस उपलब्ध होणाऱ्या अन्नपदार्थांची गुणवत्ता तपासण्याच्या अनुषंगे प्रशासनामार्फत दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत "सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा" सणासुदीचे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येणार असून, त्यामार्फत अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ अंतर्गत अंमलबजावणी, जनजागृती व प्रचार व प्रसिद्धी या तीन मुख्य घटकांवर भर दिला जाणार आहे. तसेच सदर मोहीम कालावधी मध्ये सार्वजनिक गणेश मंडळे, मिठाई उत्पादक व विक्रेते, मोदक व फराळ उत्पादन करणारे महिला स्वयंसहायता गट यांच्या अन्न स्वच्छते बाबत कार्यशाळा राबविण्यात येणार आहेत.

- **अभियानाचे घटक-**

१. अंमलबजावणी (Enforcement)

२. जनजागृती (Awareness)

३. प्रचार व प्रसिद्धी

Scanned with OKEN Scanner

१. अंमलबजावणी (Enforcement)

अ. तपासणी (Inspection)-

सदर सणासुदीच्या कालावधीत विशेष तपासणी मोहिमेच्या अनुषंगाने प्रत्येक अन्न सुरक्षा अधिकारी यांनी प्रत्येकी ३० आस्थापनांची प्राधान्याने ज्या ठिकाणी मिठाई, खवा, फरसाण, चिवडा, तळलेले पदार्थ उत्पादन व घाऊक स्वरूपात विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करावी. सदर आस्थापनांमध्ये तपासणीच्या अनुषंगाने त्रुटी आढळून आल्यास विषयांकित कायद्यातील तरतुदीनुसार सदर आस्थापनांचे परवाने निलंबन/रद्द करण्याबाबत नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

ब. अन्न नमुने (Food samples) -

सणासुदीच्या काळात (जसे की गणपती, नवरात्र, दिवाळी इ.) दूध व दुग्धजन्य अन्नपदार्थ, खवा/मावा, खाद्यतेल, ड्रायफ्रुट्स इत्यादी अन्नपदार्थांचे उत्पादन, वितरण आणि विक्री मोठ्याप्रमाणात होत असून दुर्दैवाने याचबरोबर आर्थिक प्रलोभनाच्या उद्देशाने या उत्पादनांमध्ये भेसळकारक पदार्थांची भेसळ करण्याचे प्रमाण देखील वाढते, जेणेकरून ग्राहकांच्या वाढत्या मागण्या पूर्ण करता येतील. यामुळे अन्न पदार्थाच्या गुणवत्तेच्या बाबतीत फसवणूक, भेसळ किंवा नियमबाह्य उत्पादन व विक्री होण्याची शक्यता वाढते व ग्राहकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो तसेच उत्सवाची पवित्रता कमी होते. सदर बाबीची शक्यता लक्षात घेता, सदर सणासुदीच्या मोहीम कालावधीत खाली सर्व अन्न सुरक्षा अधिकारी यांनी खालील नमूद अन्न पदार्थाचे नमुने संकलनाचे निर्देश देण्यात येत आहेत:

| अ.क्र | अन्न पदार्थ | अन्न नमुने प्रति अन्न सुरक्षा अधिकारी | राज्यात घेण्यात येणारे एकूण अन्न नमुने | प्राधान्य |
|---|---|---|---|---|
| १. | दूध | ५ | ५०० | संपूर्ण मोहीम कालावधी |
| २. | खवा/मावा | ४ | ४०० | संपूर्ण मोहीम कालावधी |
| ३. | तूप | २ | २०० | संपूर्ण मोहीम कालावधी |
| ४. | खाद्यतेल | ३ | ३०० | संपूर्ण मोहीम कालावधी |
| ५. | ड्रायफ्रुट्स | २ | २०० | दिवाळी |
| ६. | चॉक्लेटस | १ | १०० | दिवाळी |
| ७. | मिठाई | ५ | ५०० | गणपती,दिवाळी |
| ८. | भगर | २ | २०० | नवरात्र |
| ९. | इतर अन्नपदार्थ | ६ | ६०० | संपूर्ण मोहीम कालावधी |
| | एकूण | ३० | ३००० | |

Scanned with OKEN Scanner

यराप्रमाणे संपूर्ण राज्यामध्ये सुमारे किमान ३००० विविध अन्नपदार्थांचे अन्न नमुने विश्लेषणाकरिता घ्यावेत. त्यानुषंगे सर्व अन्न सुरक्षा अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशेत्रात संपूर्ण मोहीम कालावधी दरम्यान प्रत्येकी किमान ३० अन्न नमुने विश्लेषणाकरिता घ्यावेत. तसेच सर्व विभागातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी सदर सणासुदीच्या मोहीम कालावधी दरम्यान त्यांना निर्देशित केले प्रमाणे सर्वेक्षण अन्न नमुने घ्यावेत.

क. चेक नाका धाडी/जप्ती-

राज्यात सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणावर परराज्यांमधून खवा सारखे पदार्थ मागविले जातात. सदर अन्न पदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी राज्याच्या हद्दीतील आरटीओ टोलनाक्यांवर परराज्यातून येणाऱ्या खव्यासारख्या पदार्थांच्या तपासण्या कराव्यात व अन्न नमुने विश्लेषणासाठी घ्यावेत.

२. जनजागृती (Awareness)-

**अ. कार्यशाळा/प्रशिक्षण- ( सार्वजनिक गणेश/नवरात्र मंडळे, मिठाई उत्पादक व विक्रेते, मोदक व फराळ उत्पादन करणारे महिला स्वयंसहायता गट ).**

राज्यात गणेशोत्सव हा अतिशय भव्य आणि उत्साहात साजरा केला जातो. राज्यभरात हजारो सार्वजनिक गणेश मंडळे ही गणपतीची स्थापना करतात. यामध्ये काही अतिशय प्रसिद्ध व ऐतिहासिक गणेश मंडळे आहेत जी दरवर्षी लाखो भक्तांना आकर्षित करतात व जिथे मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे वितरण होते. सदर ठिकाणी अन्न सुरक्षे संदर्भात कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना अन्न सुरक्षा संबंधित कायद्यातील तरतुदींबाबत सूचना, अन्न हाताळणी मार्गदर्शक तत्वे याबाबत सर्व पदनिर्देशित अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न ) यांनी मार्गदर्शन करावे. तसेच अन्न आस्थापना त्यामध्ये विशेष करून मिठाई उत्पादक व विक्रेते, कच्चा माल पुरवठा करणाऱ्या आस्थापना यांची अन्न सुरक्षा बाबत संबंधित मोहीम कालावधी मध्ये कार्यशाळा घ्याव्यात. तसेच राज्यात सणासुदीचा काळ सुरू होत असताना, प्रशासनाच्या वतीने मिठाई उत्पादक व विक्रेते, मोदक व फराळ उत्पादन करणारे महिला स्वयंसहायता गट यांना अन्न सुरक्षिततेबाबत खालीलप्रमाणे विशेष प्रशिक्षण व कार्यशाळा घ्याव्यात .

| अ.क्र | विभाग | कार्यशाळा |
|---|---|---|
| १. | बृहन्मुंबई | ११०० |
| २. | कोकण | ११०० |
| ३. | पुणे | ११०० |
| ४. | नाशिक | ११०० |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ५. | छ. संभाजीनगर | ११०० |
| ६. | अमरावती | १००० |
| ७. | नागपूर | १००० |
| | एकूण | ७५०० |

याप्रमाणे संपूर्ण राज्यामध्ये सुमारे किमान ७५०० सार्वजनिक गणेश मंडळांचे प्रतिनिधी, मिठाई उत्पादक व विक्रेते, मोदक व फराळ उत्पादन करणारे महिला स्वयंसहायता गट यांची कार्यशाळा आयोजित कराव्यात. त्यानुषंगे विभागातील सर्व पदनिर्देशित अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशेत्रात संपूर्ण मोहीम कालावधीत कार्यशाळा आयोजित कराव्यात.

ब. Food Safety on Wheels-

सद्यस्थितीत राज्यात दोन फिरत्या प्रयोगशाळा (Food Safety on Wheels) एक FSW बृहन्मुंबई व एक छत्रपती संभाजीनगर येथे उपलब्ध असून सदर FSW चा वापर राज्यातील जनतेमध्ये अन्न सुरक्षे विषयी जन जागृती करणेकरिता, FSW चे माध्यमातून

१) चाचणी (दूध, खाद्यतेल आणि दैनंदिन वापरासाठीच्या अन्नातील इतर पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांसाठी चाचण्या),

२) जागरूकता (अन्न सुरक्षा स्वच्छता आणि मोठ्या प्रमाणावर नागरिकांमध्ये निरोगी खाण्याच्या सवयी वाढवणे)

सदर सणासुदीच्या मोहीम कालावधीमध्ये FSW च्या माध्यमातून अन्न नमुन्यांची तपासणी कराव्यात व सामान्य जनतेमध्ये अन्न भेसळ व अन्न सुरक्षितता बाबत जनजागृती करावी.

## ३. प्रचार व प्रसिद्धी :

सर्व पदनिर्देशित अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न ) यांनी सणासुदीच्या मोहीम कालावधीमध्ये त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये अन्न व्यवसायिकांकरिता अन्न सुरक्षा अंतर्गत तरतुदी व मार्गदर्शक तत्वे, सणासुदीच्या काळात ग्राहकांनी अन्न पदार्थ खरेदी करतेवेळी घ्यावयाची काळजी, ग्राहकांनी आवेष्टित (packaged) अन्न पदार्थ खरेदी करताना घ्यावयाची काळजी इत्यादी बाबत तसेच प्रशासनाने वेळोवेळी घेतलेल्या कारवाईबाबत वृत्तपत्र व ईतर प्रसिद्धी माध्यमे, समाज माध्यमे याद्वारे मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी द्यावी.

सदर अभियानामध्ये उकृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रशासनाच्या विभागाचा मा. मंत्री महोदय अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते गौरव करण्यात येईल. प्रत्येक

Scanned with OKEN Scanner

विभागातून २ अशा कायद्याचे यथोचित पालन करणाऱ्या अन्न व्यावसायिकांचे मा. मंत्री महोदय अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते गौरव करण्यात येईल.

सदर मोहीमेमध्ये घेण्यात आलेल्या पूर्ण कारवाई बाबत अंतरिम अहवाल माहे डिसेंबर २०२५ अखेर प्रकाशित करण्यात येईल व अंतिम अहवाल माहे मार्च २०२६ अखेर प्रकाशित करण्यात येईल. सदर अभियानामध्ये घेतलेल्या कारवाईबाबतची माहिती दर आठवड्याच्या सोमवारी सकाळी ११.०० पर्यंत मुख्यालयास न चुकता गुगल स्प्रेडशिट मध्ये सादर करावी.

( राजेश नार्वेकर )भा.प्र .से
अन्न सुरक्षा आयुक्त
अन्न व औषध प्रशासन ,म.राज्य,
मुंबई -४०० ०५१

प्रति,

सर्व विभागीय सह आयुक्त [अन्न],
अन्न व औषध प्रशासन, म. राज्य.

Scanned with OKEN Scanner